## <u>जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची एक दिवसीय राज्यस्तरीय परिषद</u>

## <u>दि.६ ऑगस्ट २०१५ चे महत्वाचे मुद्दे</u>

राज्यातील जिल्हा बँकांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करणेसाठी राज्य बँकेने दि.६ ऑगस्ट २०१५ रोजी सर्व जिल्हा बँकांची एकदिवसीय राज्यस्तरीय परिषद बँकेच्या सहकार सभागृह, ७वा मजला, प्रशासकीय कार्यालय, प्लॉट नं.८८, सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई येथे आयोजित केली होती.

सदर परिषदेस मा.नामदार श्री. चंद्रकांतदादा पाटील, मंत्री, सहकार व सार्वजनिक बांधकाम, महाराष्ट्र राज्य, मा.श्री.एस.के. शर्मा, प्रधान सचिव, सहकार, मा.श्री. चंद्रकांत दळवी, सहकार आयुक्त, मा.श्री.के.आर. राव, मुख्य सरव्यवस्थापक (डॉस), राष्ट्रीय बँक, मुंबई, मा.डॉ.यु.एस. साह, मुख्य सरव्यवस्थापक, राष्ट्रीय बँक, पुणे, तसेच राज्यभरातील जिल्हा बँकांचे मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते. राज्य बँकेचे मा.प्रशासक मंडळाचे अध्यक्ष मा.डॉ. एम.एल. सुखदेवे, प्रशासक मंडळाचे सदस्य मा.श्री.ए.ए.मगदूम व मा.श्री. के.एन. तांबे, व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. प्रमोद कर्नाड व इतर संबंधित अधिकारी परिषदेस उपस्थित होते.

परिषदेच्या सुरवातीस राज्य बँकेचे मा.व्यवस्थापकीय संचालक श्री. प्रमोद कर्नाड यांनी परिषद आयोजनामागे राज्य बँक, शासन व जिल्हा बँक यांना एकाच व्यासपीठावर निमंत्रित करुन जिल्हा बँका व राज्य बँकेत अधिक समन्वय साधणे व एकमेकांना पूरक अशी भूमिका वृध्दींगत करणेचा हेतू विषद केला.

राज्य बँकेचे प्रशासकीय मंडळाचे अध्यक्ष **डॉ. सुखदेवे** यांनी उपस्थितांचे स्वागत करुन परिषद आयोजनाबाबतची भूमिका खालीलप्रमाणे स्पष्ट केली.

महाराष्ट्र राज्यातील सहकारी चळवळ १०० वर्षाची आहे. काही खाजगी बँकांचे राष्ट्रीयकरण झाले नंतरही सहकारी बँकांचे ग्रामीण विकास व वित्तपुरवठ्यात महत्वाचे योगदान आहे. सध्या ४४ लाख शेतकरी हे सहकारी बँकींग क्षेत्राशी निगडीत आहेत. राज्य बँक व जिल्हा बँका एकमेकांना पुरक असून ते संबंध जोपासण्याची गरज आहे. राज्य बँक सातत्याने मार्गदर्शक/ मित्र/सहाय्यकाची भूमिका बजावत आहे. नवीन आर्थिक सुधारणांमुळे सहकारी चळवळीसमोर आव्हाने उभी राहीली आहेत. रिझर्व्ह बँकेच्या निकषानुसार काही बँकांना अधिक सशक्त होण्याची सातत्यपूर्ण आर्थिक वृध्दीची नितांत आवश्यकता आहे.

दुष्काळी परिस्थितीमुळे अपेक्षित पीक कर्ज रुपांतर, ऊसासाठी द्यावयाच्या एफआरपीचा प्रश्न, साखरेचे घसरते दर या अडचणींमध्ये सहकाराचे मुल तत्व राखून सहकार क्षेत्राचे हित साधणे आवश्यक आहे. पात्र शेतक-यांना वेळेत कर्जपुरवठा करणे गरजेचे आहे, त्याचवेळी कॉमन प्लॅटफॉर्मवर स्पर्धात्मक परिस्थितीत ठेवीदार, सभासद, ग्राहक यांना गतिमान व तंत्रज्ञानावर आधारीत आरटीजीएस/ एनईएफटी यासारख्या सेवा / सुधारणा देण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. केंद्र शासनाने उद्घोषित केलेल्या फायनान्सियल इन्क्लुजननुसार बँकिंग सुविधा तळागाळातील लोकांपर्यंत पोचविणे आवश्यक आहे. आर्थिक विकासाच्या मार्गक्रमणात सहकारी क्षेत्रासाठी शेतकरी हा केंद्रबिंदू असला पाहिजे, हेही त्यांनी प्रकर्षाने स्पष्ट केले.

**मा.ना.श्री.चंद्रकांतदादा पाटील** मा.सहकार मंत्री महोदयांनी सभेत खालीलप्रमाणे परिषदेत मर्गदर्शन केले.

- २१ जिल्हा बँकांना सन २०१५ मध्ये रु.३७९.९१ कोटीचा म्हणजे प्रति बँक केवळ रु.१८.०० कोटी नफा असल्याचे दिसते. तर १० जिल्हा बँकांना रु.९२७.३२ कोटीचा म्हणजे प्रति बँक रु.९३.०० कोटीचा तोटा दिसतो. यापुढे शासन अशाप्रकारे चालणा–या सहकारी संस्थांना आर्थिक मदत करण्याच्या मनस्थितीत नाही. ही बाब विचारात घेऊन यापुढे सहकारी संस्थांचा संचालकांनी अतिशय जबाबदारीने संस्था चालवावयाच्या आहेत.
- शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठी राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका आता ग्रामीण भागातही आपले जाळे पसरवित आहेत. त्यामुळे शेतक–यांना अनेक पर्याय उपलब्ध होत असून शेतकरी सदर पर्यायांचा स्वीकारही करीत आहेत. त्यामुळे जिल्हा बँकांनी आपले अस्तित्व टिकविण्यासाठी कारभारात पारदर्शकता, व्यावसायिकता आणि आधुनिकता आणण्याची गरज आहे.
- आता कर्जमाफी शक्य नाही. त्याचा विचारही सद्य:स्थितीत केला जावू शकत नाही.

**मा.श्री. के.आर राव, मुख्य सरव्यवस्थापक,** राष्ट्रीय बँक, मुख्य कचेरी, मुंबई यांनी सभेस संबोधित करीत असतांना सुपरवायझरी कन्सर्नबाबत पुढील मुद्दे मांडले.

- बँकिंग परवाना
- भांडवल पर्याप्तता
- ॲसेट क्वॉलिटी कर्जे
- लिक्विडीटी इश्यू
- के.वाय.सी./पी.एम.एल. नॉर्म
- वैधानिक पूर्तता
- नाबार्ड इन्स्पेक्शन रेटिंग हे.
- अंतर्गत नियंत्रण
- अपहार
- गव्हर्नन्स इश्यू

मा.व्यवस्थापकीय संचालक, **श्री प्रमोद कर्नाड** यांनी सभेपुढे खालील मुद्यानुषंगाने पॉवर पॉईन्ट प्रेझेंटेशन सादर केले.

1. Important features of Rural Co-op. Credit Structure.
2. Relations between MStCB & DCCBs.
3. Status of Deposits with MStCB.
4. Present status of deposits with MStCB.
5. Sector-wise percentage of Shares of targets of Crop loan by Banks in the State.
6. Credit limits from MStCB to DCCBs.
7. S.T. (SAO) limit by MStCB for 2015-16.
8. Deposits with MStCB vis-à-vis loans to DCCBs.

**<u>जिल्हा मध्य. सह. बँकांच्या अडचणी / अपेक्षा</u> :**

- शेती पीक कर्ज मर्यादा राष्ट्रीय बँकेच्या धोरणानुसार आर.एल.पी. ऐवजी विनाथकीत येणेबाकीशी निगडीत करावी.

- ❖ राष्ट्रीय बँक अल्पमुदत फेरकर्ज पुर्वीप्रमाणे २.५0% एवढ्या सवलतीच्या दराने प्राप्त व्हावे व राज्य बँकेने यावरील ०.५0% गाळा घेऊ नये.
- ❖ केंद्र शासन / राज्य शासन व्याज परतावा योजनेअंतर्गत रकमा वेळेवर मिळाव्यात.
- ❖ साखर कारखान्यांच्या बाबतीत साखर मुल्यांकन दर कमी होत असल्याने होणा-या शॉर्ट मार्जिनचे रुपांतरासाठी नाबार्डव्दारा कायमस्वरुपी धोरण असावे.
- ❖ उणे नेटवर्थ असणा-या कारखान्यांसाठी राज्य शासन थकहमी मिळावी.
- ❖ गुंतवणूक स्वरुपाच्या पतपुरवठ्यासाठी असलेल्या एन.पी.ए./संचित तोटा या नॉर्मस् मध्ये नाबार्डकडून Relaxation मिळावे.
- ❖ प्रक्रिया संस्थांचे प्राधान्याने साखर कारखान्यांचे नेटवर्थ काढताना त्यांच्या ॲसेटची पूनर्मुल्यांकन किंमत गृहीत धरण्यास नार्बाडचा प्रत्यवाय नसावा.

**मा.श्री.चंद्रकांत दळवी, सहकार आयुक्त,** पुणे यांनी आपले पुढीलप्रमाणे विचार व्यक्त केले.

- ➢ राज्यात २१००० प्राथमिक सहकारी सेवा सोसायटया आहेत. गटसचिव फक्त ८५०० आहेत. हे प्रमाण खूपच व्यस्त आहे. प्रत्येक सोसायटीला एक सचिव देणे आवश्यक आहे.
- ➢ जिल्हा बँकांच्या सीईओबाबत फिट ॲण्ड प्रॉपर क्रायटेरियाचे पालन झाले पाहिजे.
- ➢ युनिट एक्सपोजर व सेक्टोरल एक्सपोजरची लिमिट बँकांनी पाळणे अत्यंत आवश्यक आहे.
- ➢ इन्व्हेस्टमेंट क्रेडिटबाबत बँकांनी खूपच दुर्लक्ष केले आहे. आता नाबार्ड १००० कोटी रक्कम राज्याला द्यायला तयार आहे. सदर रक्कम पात्र जिल्हा बँकांनी थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी घ्यायला पाहिजे.
- ➢ इंटरेस्ट सबव्हेंशन स्कीमचे अनुदान वन विंडो मिळण्याबाबत शासन विचार करीत आहे.
- ➢ विकास सोसायटयांचे संचालक मंडळ, सहकारी बँकांचे संचालक मंडळ यांना देखील प्रशिक्षण देण्यात यावे. मार्च अखेरपर्यंत १००% प्रशिक्षण पूर्ण होणे आवश्यक आहे.

-----